# वाङ्मय मंडळ अहवाल (२०१५-१६)

*प्रा.श्रीमती के.व्ही.चव्हाण*

*(वाङ्मय मंडळ प्रमुख)*

विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना प्रोत्साहन देणे... वकृत्व, वादविवाद, निबंध, काव्यवाचन, इतर स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन व मार्गदर्शन करणे विधार्थ्यांमध्ये लेखन गुणांचा विकास करणे. लेखन वाचनातून साहित्यिक अभिरुची वृद्धिंगत करणे यासाठी तज्ञांची व्याख्याने आयोजित करणे या हेतूने मराठी, हिंदी व इंग्रजी विभागातर्फे महाविद्यालयात वाङ्मय मंडळ चालविले जाते. अभ्यासक्रमावर आधारित चांगले चित्रपट, नाटक दाखविण्यासाठी इथक क्लब आहे. तसेच विधार्थ्यांच्या मदतीने भित्तीपत्रका चालविली जाते २७ फेब्रु मराठी दिन व १४ सप्टेंबर हिंदी दिन साजरा केला जातो. २०१५-१६ या शैक्षणिक वर्षात वाङ्मय मंडळाचे उद्‌घाटन मा. प्राचार्य डॉ. अंकुश बांदल यांच्या हस्ते झाले. यावेळी मार्गदर्शन करताना त्यांनी मराठी व इंग्रजी साहित्याचा परस्परसंबध उलगडून दाखवत साहित्याचे महत्त्व सांगितले.

डॉ. अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्त १५ ऑक्टोबर 'वाचन प्रेरणा दिन' साजरा करताना ग्रंथ प्रदर्शन आयोजीत करण्यात आले त्यात विश्वकोश, संस्कृती कोश, शब्दकोश, संदर्भ ग्रंथ व ललित साहित्यकृतीच्या मांडणीतून विद्यार्थांना एक वेगळा अनुभव मिळाला. १४ सप्टेबर 'हिंदी दिना' निमित्त मा. प्राचार्य डॉ. ठाकरे याचे व्याख्यान झाले. त्यांनी 'हिंदी भाषेचे व्यावहारिक उपयोजन' या संदर्भात मार्गदर्शन केले.

'इथिका फिल्म क्लब' तर्फे 'द मर्चंट ऑफ व्हेनिस' 'द इम्पोर्टन्स ऑफ बेईंग अर्नेस्ट' हि इंग्रजी नाटके, तसेच 'नटसम्राट' हे मराठी नाटक व त्यावर आधारित 'नटसम्राट' चित्रपट दाखविण्यात आला. २७ फेब्रु 'मराठी दिना' निमित्त सुंदर हस्ताक्षर स्पर्धा घेण्यात आली. विध्यार्थ्यानी काव्यवाचन करून कविवर्य कुसुमाग्रजांना आदरांजली वाहिली. प्रा. श्रीमती चव्हाण के. व्ही, प्रा. डॉ. मंजूर सैय्यद, प्रा. आर. बी. शिंदे यांच्यासोबत तिन्ही विभागातील प्राध्यापकांचे मंडळाचे कामकाज चालविताना सहकार्य लाभले. वाङ्मय मंडळाचे उपक्रम राबवितांना महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. ए. पी. पाटील यांचे मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले त्याबद्दल आम्ही ऋणी आहोत. धन्यवाद...!

Patil

प्राचार्य

कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय

ओझर(मिग), ता. निफाड, जि. नाशिक

ARTS, SCIENCE & COMMERCE COLLEGE OZAR (MIG) 275219